**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी**
**कंत्राटी कनिष्ठ अभियंता भरती अर्ज स्विकारणेसाठी मुदतवाढ देणेबाबत जाहिरात.**

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत उपविभागीय कार्यालयात कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ८ पदे व (यांत्रिकी) १ पद भरण्याकरिता दिनांक १४ माचे २०२० चे वृत्तपत्रात (दैनिक रत्नागिरी टाईम्स व दैनिक सागर) जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. पदाबाबत इतर तपशील www.ratnagiri.nic.in ;या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला होता. अर्ज स्विकारण्याची मुदत  दिनांक १६ मार्च २०२० ते ३० मार्च २०२० देण्यात आली होती. दिनांक २२ मार्च २०२० पासून संपूर्ण भारत देशात कोरोना प्रार्दुभाव (कोविड १९) मुळे लॉकडाऊन करण्यात आले. लॉकडाऊन असल्यामुळे काही उमेदवार यांना पात्र असूनही अर्ज विहीत मुदतीत सादर करता आलेले नाहीत. त्यामुळे वरील पदासाठी अर्ज स्विकारण्यासाठी दिनांक २६.०५.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.**परंतु दिनांक ३१.०७.२०२० पर्यत लॉकडाऊन वाढविण्यात आल्यामुळे, त्यामुळे वरील पदासाठी अर्ज स्विकारण्यासाठी दिनांक २७.०७.२०२० पर्यत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.** तरी इच्छुकांनी दिनांक २७.०७.२०२० पर्यंत सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी , डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, जिल्हा परिषद रत्नागिरी  (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग ) या पत्त्यावर पोस्टाने अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष सादर करावेत. **विहीत मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.**

सही/-(एन.एस.माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

.................................................................................................

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत उप विभागीय कार्यालयांमध्ये "कनिष्ठ अभियंता" ही पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याची आहेत. सदर पदांची संख्या,आवश्यक शैक्षणिक अर्हता व मानधन याची माहिती पुढीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता(स्था) | ८ | अ)मान्यता प्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका किंवा पदवी<br>ब)मराठीचे ज्ञान आवश्यक<br>क)संगणकाचे ज्ञान आवश्यक (Computer Literate With Working Knowledge MS-Office) | एकत्रित मानधन र.रू.२०,०००/- ते र.रु.२२,०००/- व इतर भत्ते |
| २. | कनिष्ठ अभियंता(यां) | १ | अ)मान्यता प्राप्त संस्थेची यंत्र अभियांत्रिकी मधील पदवी किंवा पदविका<br>ब)मराठीचे ज्ञान आवश्यक<br>क)संगणकाचे ज्ञान आवश्यक (Computer Literate With Working Knowledge MS-Office) | एकत्रित मानधन र.रू.२०,०००/- ते र.रु.२२,०००/- व इतर भत्ते |

**<u>आरक्षण निहाय विगतवारी...</u>**

| पदाचे नाव | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा. प्र | इ.मा. व | एस.ई. बी.सी. | ई.डब्लु. सी. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कंत्राटी अभियंता (स्था) | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ३ | ८ |

टिपः- कनिष्ठ अभियंता(यां) हे एकच पद भरावयाचे असल्याने सदर पदास कोणतेही आरक्षण लागु राहणार नाही.

इच्छूक उमेदवारांनी जाहिरातीचा व सुचनांचा अभ्यास करुन सर्व कागदपत्रांसह सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह दि.२७.०७.२०२० रोजी सायं.०५:४५ वाजेपर्यंत "मुख्य कार्यकारी अधिकारी,तिसरा मजला,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,जिल्हा परिषद रत्नागिरी" या पत्त्यावर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत सादर करावा. विहित तारखेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच अपूर्ण स्वरुपात आलेले अर्ज पदभरती प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत,याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. पदभरती प्रक्रियेत बदल करणेचे अथवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीस राहतील.

सही/-(एन.एस.माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

## अटी व शर्ती

१ अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,वयाचा पुरावा,जातीचा दाखला व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेबाबत प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारण्यात येईल.

२ अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.५००/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.२५०/- चा “मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद रत्नागिरी” यांचे नावे असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष अर्जासोबत जोडावा. परिक्षा शुल्क न जोडलेले अर्ज अपात्र समजणेत येतील. अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

३ लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

४ उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार A-४ आकाराच्या कागदावर एकाच बाजूला संगणकावर टंकलिखीत अर्ज करावा.

५ उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराचा अलिकडील रंगीत फोटो लावून त्यावर स्वतःची स्वाक्षरी करावी.

६ अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि.२७.०७.२०२० रोजी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष अशी राहील. तसेच मागास/अपंग प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा किमान १८ वर्ष व कमाल ४३ वर्ष अशी राहील.

७ अर्जासोबत २३X१३ सेंमी.आकाराच्या स्वतःचे नाव व पत्ता असलेला र.रु.१०/- तिकीट लावलेला एक लिफाफा पाठवावा.

८ उमेदवाराने विहित नमुन्यात भरुन पाठविलेले अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते दि.२७.०७.२०२० रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पोस्टाने अथवा हातरवानगीने पाठवावेत. कोणत्याही कारणाने विलंबाने प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

९ अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांची यादी www.ratnagiri.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना आवश्यकतेनुसार मुलाखतीसाठी स्वखर्चाने परिक्षेच्या ठिकाणी हजर रहावे लागेल. या बाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

१० महाराष्ट्र शासन,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१६७/पापु-०७ दि.०४.०६.२०१४ मधील जोडपत्र -२ निवड करण्यासाठी गुणदान पध्दती अवलंबिण्यात येईल.

११ मुलाखतीबाबतचे वेळापत्रक नंतर प्रसिध्द करण्यात येईल.निवड झालेला उमेदवार ८ दिवसात कार्यालयात हजर न झाल्यास सदरहू नियुक्ती आदेश रद्द समजणेत येईल.

१२ न्यायालयीन स्थगिती/निवाडा किंवा शासन निर्णयामुळे निवड प्रक्रिया कुठल्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द अथवा बदल करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील.

१३ विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज,अपूर्ण अथवा चुकीचे भरलेले अर्ज,संगणकावर टंकलिखीत नसलेले अर्ज,वय,शैक्षणिक अर्हता,जातीचा दाखला,अनुभव इ. संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज,विहित केलेल परिक्षा शुल्क न जोडलेले अर्ज,विहित मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज अन्य मार्गाने शुल्क भरलेले अर्ज अपात्र समजणेत येतील.

१४ निवड झाल्यानंतर र.रु.१००/- च्या मुद्रांक पेपरवर आवश्यक अटी व शर्तीनुसार करारपत्र करुन द्यावे लागेल.

१५ सदरचे पद कंत्राटी पधतीचे असलेने भविष्यात सदरची नेमणूक नियमित शासकीय सेवा म्हणूण ग्राह्य धरली जाणार नाही. अथवा सदरबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

सही/-(एन.एस.माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

# अर्जाचा नमुना

**पदाचे नांव:-**

| उमेदवाराचा अलीकडे काढलेला स्व-साक्षांकित फोटो |
|---|

१.उमेदवाराचे संपूर्ण नाव(आडनाव प्रथम):- श्री.

२.जन्मतारीख(सोबत आवश्यक कागदपत्र):-

अर्ज करण्याच्या अंतिम दि.                रोजी वय:-

३.जन्माचे ठिकाण:-

४.(अ)जात:-

(ब)जातीचा प्रवर्ग(योग्य तेथे ✓ खूण करावी)

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | एस.ई.बी.सी. | ई.डब्लु.सी. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

टिप- उन्नत व प्रगत (क्रिमीलेअर) गटात समाविष्ठ असणाऱ्या वि.जा.(अ), भ.ज.(ब) भ.ज.(क), भ.ज.(ड).वि.मा.प्र.,इ.मा.व.,एस.ई.बी.सी. व ई.डब्लु.सी. प्रवर्गातील उमेदवारांनी सुरू असलेल्या आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्र सोबत जोडावे अन्यथा खुला प्रवर्ग नमुद करावा.

५.अर्जदार विवाहीत/अविवाहीत (✓) अशी खूण करावी.

| विवाहीत | अविवाहीत |
|---|---|
| | |

४.शैक्षणिक/तांत्रिक पात्रता (इ.१० वी पासून):-

| अ.क्र. | उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्कवारी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

५.अवगत असलेल्या भाषाः-

| अ.क्र. | भाषा | बोलता येते (होय/नाही) | वाचता येते(होय/नाही) |
|---|---|---|---|
| १. | मराठी | | |
| २. | इंग्रजी | | |
| ३. | इतर | | |

६.पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता व ई-मेल(पत्ता पीन कोडसह):-

७.संपर्कासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक(वैयक्तीक व कार्यालयीन):-

८. शासकीय सेवेतील कामाचा किमान ६ महीन्याचा अनुभव(कालानुक्रम निहाय):-

| अ.क्र. | काम कलेली संस्था व पत्ता | कामाचा कालावधी | | पदाचे नाव व वेतन | कामकाजाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | |
| | | | | | |

९.सध्याचे कामाचा प्रकार(कंत्राटी/नियमित):-

१०.इतर तपशिल

## **प्रतिज्ञापत्र**

मी असे प्रमाणीत करतो/करते की,प्रस्तुत पदाची जाहिरात मी वाचली असून त्यातील पदाविषयक माहिती काळजीपूर्वक वाचली आहे व मला ती मान्य आहे. सदर परिक्षेस प्रवेश मिळविण्यासाठी नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तींची मी पूर्तता करतो/करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला दिलला प्रवेश रद्द होईल आणि मिळालली नोकरी गमावण्यास मी बांधील राहीन व पुढील योग्य त्या कारवाईस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

स्थळ -

दिनांक- उमेदवाराचे संपुर्ण नाव व स्वाक्षरी